कार्यालय पोलीस अधीक्षक
दिनांक ०८.१०.२०१७

मा. पोलीस अधिक्षक यांनी गडचिरोली जिल्हयातील अवैध दारु विक्रि, जुगार, मटका, सट्टा अशा प्रकारचे बेकायदेशिर व्यवसाय करणा-या व्यवसयीकांवर आळा घालण्याकरीता स्थानिक गुन्हे शाखा येथील अधिकारी /कर्मचारी यांचेवर जबाबदारी सोपविलेली असता, दिनांक ०६.१०.२०१७ रोजीचे हॅलो गडचिरोली या दैनीक वृत्तपत्रामध्ये तालुका कोरची अंतर्गत मौजा कोरची तसेच आजुबाजुचे खेडपाडयात सुध्दा सट्टापट्टि मटका जुगारासंबधात बातमी प्रकाशीत झाली असता, सदरची जबाबदारी पार पाडतांना स्थानिक गुन्हे शाखेमधील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांनी आप-आपले गोपनिय बातमीदार सक्रिय करुन गडचिरोली जिल्हयातील अवैध व्यवसायांसंबधात माहिती घेतली असता, गोपनिय सुत्राकडुन विश्वसनियरित्या माहिती मिळाली कि, मौजा कुरखेडा ता. कुरखेडा, जिल्हा गडचिरोली येथील सट्टापट्टि मटका जुगार चालविणारा नामे अनिल लक्ष्मणदास माखीजा हा मौजा कोरची येथील बस स्टॉप चौकात तसेच कोरची तालुक्यातील खेडयापडयात सुध्दा मटका जुगाराचा डावा मांडुन स्वत: तसेच स्वत:चे इतर एजंट तयार करुन त्यांच्या मार्फतीने लोकांकडुन पैसे घेवुन त्यांना मटका जुगाराचे आकडे लिहुन देवुन त्यावर हारजितचा डाव मांडला असल्याची माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे मौजा कुरखेडा येथे मटका जुगार रेड संबधाने कायदेशिर कारवाई करण्यासंबधात मा. अभिनव देशमुख, पोलीस अधिक्षक गडचिरोली यांना पुर्वकल्पना देवुन त्यांचे आदेशान्वये तसेच मा. महेंद्र पंडीत, अपर पोलीस अधिक्षक गडचिरोली यांचे मार्गदर्शनाखाली मटका जुगार रेड करीता पोलीस अधिकारी पोलीस निरीक्षक प्रदिप लांडे, हे स्वत: सोबतचे पोलीस पथकामधील दादाजी करकाडे, भाऊराव बोरकर, प्रेमकुमार दुर्गे, प्रमोद वाळके, उध्दव नरोटे, चंदु मोहुर्ले, प्रशांत पातकमवार, अशा प्रकारे पोलीस पथक तयार करुन योग्य प्रकारे सापळा रचुन गोपनियता व नक्षल सुरक्षीतता बाळगुन कोरची सारख्या नक्षलप्रभावीत संवेदनशिल भागात पोहचुन नामे अनील लक्ष्मणदास माखीजा याचे अधिपत्या खाली मटका जुगार चालु असलेल्या ठिकाणी रेड केला असता, त्या ठिकाणी नामे १) धर्मराज मनीराम घाटघुमर रा. टेमली, २) गौतम लक्ष्मण जमकातन रा. कोरची, ३) हरीष मेश्राम रा. कोरची,४) अनिल सोनकुकरा रा. कोरची, हे स्थानिक लोकांकडुन मटका जुगाराचे डावाकरीता पैसे घेत असतांना मिळुन आले, यातील आरोपी क्र ३ व ४ लोकांच्या गर्दीचा फायदा घेवुन पळुन गेले. घटनास्थळी मिळुन आलेल्या आरोपी क्र १ व २ यांचे ताब्यात जुगाराचे डावातील रोख रक्कम ७४१०/- व इतर आवश्यक साहित्य असे एकुन ११,११५/- रुपयाचा मुद्देमाल जप्ती केला. बेकायदेशिररित्या मटका जुगाराचा डावा चालविणारा इसम नामे अनिल लक्ष्मण माखीजा रा. कुरखेडा तसेच त्याचे प्रतिनीधी नामे १) धर्मराज मनीराम घाटघुमर रा. टेमली, २) गौतम लक्ष्मण जमकातन रा. कोरची, ३) हरीष मेश्राम रा. कोरची,४) अनिल सोनकुकरा रा. कोरची यांचे विरुध्द पोलीस स्टेशन कोरची येथे महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हा नोंद करुन कायदेशिर कारवाई करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेकडुन झालेल्या कारवाई मुळे कोरची सारख्या नक्षलग्रस्त भागात सुध्दा चालु असलेल्या अवैध मटका जुगार चालविणा-या लोकांवर अंकुश बसला असुन त्यांचे धाबे दणालेले आहेत.


बाम्बे डे - 349-6
नेट => 146- 1
मनीपुर => 158-4
नेट =>
नेट =>
कुबेर => 61